युवक क्रांती दल, हिंद मजदूर किसान पंचायत, संघर्ष समिती – खालापूर

संपर्क :– ॲड. राजीव पाटील, ३६, कृष्ण कुंज, डॉ. म. ब. राऊत मार्ग, शिवाजी पार्क, मुंबई–२८.

दिनांक : १६ एप्रिल, ८७

प्रति,

मा. ______________________________

क्रांतीकारक अभिवादन,

सोमवार दि. १३ एप्रिल, ८७ रोजी रात्रौ १०.४५ वा. खालापूर [जि. रायगड] येथे युवक क्रांती दल, महाराष्ट्राचे पूर्णवेळ कार्यकर्ते, सहकार्यवाह, संघर्ष समितीचे नेते व हिंद मजदूर किसान पंचायतचे राज्य कार्यकारिणी सदस्य मधु मोहिते तसेच युक्रांद, महाराष्ट्रचे कार्यवाह व हिंमकिपं. चे राज्य का. का. सदस्य शांताराम पदेरे आणि संघर्ष समिती खालापूरचे पूर्णवेळ कार्यकर्ते नत्थु पवार, नारायण पवार यांच्यावर बंदुका, गज व चाकूंनी खूनी हल्ला करण्यात आला. त्या प्रकरणाची सविस्तर माहिती व त्या मागील राजकारण येथे देत आहोत.

कष्टकरी – दलित, आदिवासी – भटके–विमुक्त व स्त्रियांच्या मूलभुत मानवी हक्कांसाठी चाललेल्या या लढयात आपण सक्रिय सहभाग घाल, ही अपेक्षा.

आपले,

अजित सरदार — निर्मला स्वामी — अनिल मेश्राम

गंगाधर त्रिभुवन — वसुधा सरदार

मध्यवर्ती कार्यकारिणी सदस्य, युवक क्रांती, महाराष्ट्र,

सारथी शंकर साळवी, सरचिटणीस, हिंद मजदूर किसान पंचायत, महाराष्ट्र,

यशवंत पवार, कांता डोकरे, गणेश कातकरी – संघर्ष समिती, खालापूर.

## खालापूर येथील खूनी हल्ला :– वस्तुस्थिती व राजकारण

सोमवार दि. १३ एप्रिल, ८७ रोजी रात्रौ १०.४५ वाजतां खालापूर [जि. रायगड] येथे एका घरात जेवत असतांना कुंडेवहाळ [ता. पनवेल] येथील एक खडी व्यापारी, दारू धंदा करणारा व जमिनींचे मोठे व्यवहार करणारा गुंड धनाजी शेठने ५ ते ६ सशस्त्र गुंडांच्या सहाय्याने संघर्ष समितीचे नेते मधु मोहिते व युक्रांद, कार्यवाह शांताराम पदेरे यांच्यावर बंदुकीतून गोळ्या झाडून व लोखंडी गज व चाकूने खूनी हल्ला केला. संघटनेच्या या दोन प्रमुख कार्यकर्त्यांना ठार मारण्याचाच या गुंडांचा उद्देश होता. या खूनी हल्ल्यात मधु मोहिते यांना डोके, छाती व पायावर गंभीर जखमा झाल्या आहेत. गोळीबारामुळे रक्तबंबाळ व बेशुध्द अवस्थेत मोहिते यांना खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. तेथील डॉ. सय्यद यांच्या सूचनेवरून अखेर त्यांना सायन हॉस्पिटल – मुंबई येथे दाखल करण्यात आले आहे. तर पदेरे यांच्या हात, बरगडी व पायावर जखमा झाल्या आहेत. स्थानिक कार्यकर्ते नत्थु पवार व नारायण पवार यांनाही मार लागला आहे.

घटना स्थळास अलिबागचे डि. वाय्. एस्. पी. प्रभु, खालापूरचे तहसिलदार यांनी भेट दिली व चौकशी केली. खालापूरचे सिनिअर फौजदार शेख यांनी या प्रकरणी भा. दं. वि. नुसार ३०७, १४७, १४८, १४९, ४५२ नुसार खटला दाखल केला आहे.

...२.

हल्लेखोर धनाजी शेठ व इतर आरोपी फरार असल्याचे ते सांगत आहेत.

घटना - पार्श्वभूमी :

सुमारे पाच वर्षांपूर्वी रायगड जिल्ह्यातील सुधागड - पाली, खालापूर, रोहा तालुक्यांमध्ये युक्रांदने "संघर्ष समिती" च्या माध्यमातून तेथील आदिवासी दलित शेतकरी-शेतमजूरांची चळवळ सुरू केली. पाली व खालापूर येथे आदिवासी-दलितांची मोठ्या प्रमाणावर लढा सुरु झाला.

गावठाण, जमिनींचा महत्वाचा प्रश्न :

रायगड जिल्ह्यात पाताळगंगा नदीच्या काठावर मोठ्या प्रमाणावर रासायनिक कारखाने उभे राहिले आहेत. नविन प्रकल्प उभारले जात आहेत. परिणामी या भागातील शेतजमीन व गावठाणच्या जमिनींना माणसांपेक्षा अधिक महत्व येऊन लाखो रूपये एकराचा भाव झाला आहे. त्यामुळे पिढ्यान् पिढ्यांपासून करत असलेल्या शेतजमिनी व वस्ती असलेल्या गावठाणांवरून कातकरी-ठाकर आदिवासींना बंदुकीच्या जोरावर सगळीकडून हुसकावून लावण्यात येत आहे. जमिनीखाली करून त्या लाखो रूपयांना कारखानदारांना विकल्या जात आहेत. त्यामुळे आदिवासी-दलितांमध्ये कमालीची असुरक्षितता व असंतोष पसरला आहे. पिण्याचे पाणी, वीज, रस्ता व रोजगाराचे प्रश्न तर गंभीर स्वरूपात उभे ठाकले आहेतच.

"गावठाणच्या या जमिनी तेथे रहाणा-या आदिवासी-दलितांच्या नांवे करण्यात" या मुख्य मागणीवर खालापूर तालुका व परिसरात चळवळ सुरु झाली.

टायरमध्ये घालून मारहाण व शॉकचे प्रकार :

या भागातील आदिवासी - दलितांना खोट्या केसेसखाली अटक करणे, गावठाणवर ज्यांची नजर आहे. त्यांच्या सांगण्यावरुन संपूर्ण वाडीला झोडपून काढण्याचे प्रकार सर्रास या भागात चालतात. खालापूर पोलिस ठाण्यात टायरमध्ये आदिवासी - दलिताला घालून त्याला झोडपून काढण्यात येते. विजेचे शॉक्स् देण्यात येतात. या शिक्षण छळापायी खालापूर परिसरात अनेक तरूण वर्षांपासून जंगलात - डोंगरात लपून रहात आहेत.

या प्रकारामुळे खालापूरच्या गोदाबाई दाजी हिचा एकुलता एक मुलगा वेडा झाला व त्याला पोलिसांनी बेपत्ता केला आहे. तेथील गणेश लहान्या पवार यास टायरमध्ये घालून मारहाण व शॉक दिले गेले. अशी अनेक प्रकरणे आहेत. भांडीकुंडी, कपडे लत्ते पोलिसांनी सर्रास पळविले आहेत. ना नोंद ना पावती अशी अवस्था.

या सर्व शिक्षण छळास आळा बसावा व इतर मागण्यांसाठी २ एप्रिल, ८७ रोजी प्रथमच खालापूर येथे या शेतकरी-शेतमजूरांची जाहिर सभा घेण्यात आली. त्यानंतर तहसिलवर मोर्चा नेण्यात आला. त्यावेळी तहसिलदारांनी १३ एप्रिल, ८७ रोजी सर्व विभाग प्रमुखांसमवेत बैठक घेण्याचे जाहिर केले. या सभा व मोर्च्यात हिंद मजदूर किसान पंचायतचे नेते साथी शरदराव, राज्य चिटणीस साथी शंकर साळवी, म्युनि. लेबर युनियनचे सरचिटणीस प्रभाकर आडेरकर, युक्रांद महाराष्ट्र कार्यवाह, शांताराम पंदेरे, अजित सरदार, निर्मला स्वामी, सहकार्यवाह व संघर्ष समितीचे मधु मोहिते यांनी भाषणे केली होती. सुमारे ३ हजार लोक यावेळी उपस्थित होते.

....३.

## १३ एप्रिल ८७ ची बैठक :

तहसिलदारांनी ठरल्याप्रमाणे १३ एप्रिल ८७ रोजी दु. ३.०० वाजतां खालापूर तहसिलमध्ये बैठक सुरु होवून सायंकाळी ५.३० वाजतां संपली. या बैठकीत संघर्ष समितीने तहसिलदार व सिनि. फौजदार यांना दोन स्वतंत्र निवेदने सादर केली. या बैठकीला तालुक्याचे सभापती, भूजल सर्वेक्षण यंत्रणा, जंगल खाते, कृषि आदि विभागांचे अधिकारी, तसेच पनवेलचे सर्कल इन्स्पेक्टर मोहन कांबळे, खालापूरचे सिनि. फौजदार शेख, सिंर्कापं चे सरचिटणीस शंकर साळवी, मधु मोहिते, प्रभाकर आडेरकर, शांताराम पदेरे आदी प्रमुख हजर होते. तहसील बाहेर हजारो आदिवासी-दलित जमा झाले होते. <u>या बैठकीत दोन अत्यंत महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.</u>

१] गावठाण वरील सर्व आदिवासी-दलितांची नांवे ७/१२ वर इतर हक्कात घालण्याचा कार्यक्रम ३१ ऑगस्ट ८७ पर्यंत पूर्ण करणे. तोपर्यंत या जमिनीच्या कोणत्याही व्यवहाराच्यावेळी संघर्ष समिती व संबंधित आदिवासी-दलितांना विश्वासात घेतले जाईल.

२] कडेवहाळचे धनाजी शेठ याने आदिवासी स्त्रियांवर चालविलेल्या अमानुष अत्याचारांची चौकशी येत्या १५ दिवसात पूर्ण करणार व त्यांच्या बंदुका जप्त करुन परवाना रद्द करण्यात येईल, असे स्पष्ट आश्वासन तहसिलदार, फौजदार व सर्कल इन्स्पेक्टर यांनी दिले. त्यांच्या प्रकरणांची यादीच त्यावेळी वाचून दाखविण्यात आली.

## धनाजी शेठची कृत्ये :

याची खडी सेंटर्स, दारूचे गुत्ते आहेत. मोठया बागा आहेत. बंदुकीच्या जोरावर वाडयाखाली करून ती जमिन विकण्याचा तो धंदा करतो. पनवेल, खालापूर भागात त्याच्या सहा-सात बायका आहेत. काही खून प्रकरणात त्याला शिक्षाही झालेली आहे.

गेल्या मार्च ८६ मध्ये टेंभरी [ता. खालापूर] येथील कातकरी वाडीवर लागोपाठ तीनवेळा त्याने हल्ले केले. ट्रक भरून गुंड आणून बंदुकीच्या फैरी झाडून सर्व बाया व मुलांना झोडपून काढले.

एका आदिवासी स्त्रिला सर्वासमक्ष उचलून नेऊन चार दिवस ठेवून नंतर खालापूर पोलिसांच्या मदतीने तिच्यावरच खोटी केस घालून तिला अटक करायला लावली.

या टेंभरी वाडीवरील चार कुत्रे व दोन बकऱ्यांना धनाजी शेठने चाकू व गोळीबारात ठार केले. शेकडो कोंबडया, सर्व बकरे उचलून नेले. वाडीतील सर्व भांडी, खाटा घेऊन गेले. जिवाच्या भितीने सर्व आदिवासी डोंगरात पळून गेले. अजून काहीजण फरार आहेत.

या लुटालुट व हल्ल्यानंतर खालापूरच्या पोलिसांनी मात्र राघो शिवा [वय ६०] गणू किसना [वय ६५], लक्ष्मी जान्या [वय ५०], नथी दासू [वय २५] आदी १० स्त्री-पुरुष कातकऱ्यांना विविध खोटया गुन्हयाखाली अटक केली. या सर्व केसेस खालापूर कोर्टात चालू आहेत.

मात्र या धनाजी शेठ विरुध्द एकही केस नाही. कारण त्याने सर्व पोलिस ठाणी आपल्या खिशात ठेवली आहेत.

या सर्व आदिवासी स्त्रियांना दि. १३ रोजी तहसिलमध्ये हजर करण्यात आले होते. स्त्रियांचा अशा अमानुष छळकरणा-यांविरुध्द जोरदार लढा देण्याची घोषणाही त्यानंतरच्या सभेत करण्यात आली होती.

ही सर्व बोलणी व सभा सावध झालेल्या धनाजी शेठ व त्याच्या माणसांनी ऐकली होती. मात्र त्याची कल्पना संघर्ष समिती व युक्रांदच्या कार्यकर्त्यांना नव्हती.

प्रत्यक्ष हल्ल्याची घटना :

खालापूर तळ्याजवळच्या गोविंद पवार गुरूजी यांच्या घराच्या अंगणात रात्री १०.३० पर्यंत प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक झाली. सर्वजण घरी परतले. त्यानंतर १०.४५ वाजता घरातील स्वयंपाक घरात मधु मोहिते, शांताराम पंदेरे, नत्थु पवार बळीराम, नारायण पवार व गोविंद गुरूजी जेवायला बसले तोच एक जीप घरा समोरच्या रस्त्यावर आली. त्यातील एक जण स्वयंपाक घराच्या खिडकीत जेवणा-यांवर बंदूक रोखून थांबला. स्वत: धनाजी शेठने अंगणात बसलेल्या एका पांडुरंग [पांगा] नांवाच्या आदिवासी तरुणाला बंदुकीने रोखले. एक जण जीपजवळ बंदूक घेऊन उभा राहिला. आणि दोघे जण हातात लोखंडी गज घेऊन स्वयंपाक घरात घुसले. "मोहिते व पंदेरे कुठे आहेत" म्हणून विचारले. हे दोघे दिसताच त्यांच्यावर गजांनी हल्ला चढविला. अत्यंत बेसावध असणा-या या कार्यकर्त्यांना काही समजायच्या आत हे सर्व घडत होते. बाकीच्यांना फटके मारले. काहीजण कसेबसे निसटून पोलिस ठाण्यावर तर काहीजण कातकरी वस्तीकडे धावले. घरातील स्त्रिया व मुले भितीने ओरडायला लागली. मधु मोहितेंचे डोके फुटले. त्याला ओढत बाहेरच्या खोलीत आणले. तेथे दारातून स्वत: धनाजी शेठनें गोळी मारली. ती मोहितेंच्या उजव्या पायाला नळीला लागली. प्रचंड रक्तस्त्रावामुळे व सततच्या माराने ते बेशुध्द पडले. स्वयंपाक घरात पंदेरेंवर गजांनी मारहाण चाललीच होती. नंतर गुंडांनी घरातील पेट्रोमॅक्सची बत्ती व कंदिल फोडले. सुमारे १२ मिनिटानंतर १/२ कि.मि. अंतरावरील कातकरी स्त्री-पुरूष धावत येताच त्यांच्यावर गोळीबाराच्या पाच फैरी झाडण्यात आल्याव त्यांना रोखण्यात आले. मोहिते व पंदेरे यांना तसेच फेकून सर्व गुंड जिपमधून सुसाट वेगाने निघून गेले. या घटनेनंतर गोविंद गुरूजींना सांगितल्यावर खालापूर पोलिस ठाण्यातील ४-५ पोलिस जिपने घटनास्थळी आले. त्यावेळी रात्रीचे ११.१० वाजले होते. जबर जखमी व बेशुध्दावस्थेतील मोहिते व पंदेरेंना जिपने तात्काळ तेथील प्राथमिक आरोग्य केंद्रात हलविण्यात आले. तेथे डॉ. सय्यद यांनी औषधोपचार केले. मोहिते यांच्या डोके, ओठ व पायाला टाके घातले गेले. नंतर त्यांना पोलिस ॲम्ब्युलन्सने डॉक्टरच्या सांगण्यावरून सायन हॉस्पिटलमध्ये पहाटे दाखल करण्यात आले व पंदेरेसह इतर जखमींना इलाज झाल्यावर तेथेच राहिले. त्यानंतर पंदेरे यांचा जबाब घेऊन फिर्याद नोंदवून घेण्यात आली.

रात्री घटनास्थळाजवळ एकून तीन काडतूस व सहा वायसर सापडले. ते पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले आहेत.

या घटनेच्या वेळी काही संशयास्पद प्रकार घडले आहेत. :

१] स्वत: सिनि. फौजदार यावेळी स्वत:च्या घरी खोपोलीला [सुमारे ६ कि.मि.] धार्मिक कामासाठी गेले होते. त्यामुळे ते तेथे हजर नव्हते.

२] हल्ला होण्यापूर्वी आरोपींची जिप पोलिस ठाण्याला लागून असलेल्या रस्त्यावरून घटनास्थळ मागे १ १/२ कि.मि. वरील वणवे गावात जावून परत आली. व हल्ला केला होता. हल्ल्यानंतरही जिप पोलिस ठाण्यावरूनच गेली. त्यावेळी सर्व

पोलिस झोपले होते.

३] वणवे गावची दोन प्रमुख माणसे हल्ल्यापूर्वी व नंतर घटनास्थळाजवळ सायकल व लुनाने फिरत होती. ते दोघे धनाजी शेठचे जवळचे दोस्त आहेत.

४] हल्ला चालू असताना गावातील लाईट गेले होते.

५] हल्ला झाल्यानंतर पोलिस ठाण्यातील फोन बंद पडला व त्याची वायर तुटलेली होती.

६] धनाजी शेठ व आरोपी फरार असल्याचे पोलिस सांगताहेत. परंतु धनाजी पनवेल परिसरात त्याचे व्यवहार करीत आहे.

सर्व परिसरात अत्यंत घबराटीचे व दहशतीचे वातावरण आहे. परत हल्ला होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अजून कोणत्याही प्रकारचे संरक्षण गावातील कार्यकर्ते, साक्षीदार व जखमींना दिले गेलेले नाही. स्थानिक वा जिल्ह्यातील पोलिसांकडून या प्रकरणाबाबत नि:पक्षपातीपणे चौकशी होईल असे वाटत नाही.

म्हणून खालील मागण्या आम्ही करीत आहोत -

१] खालापूर गोळीबार व खुनी हल्ला टेंभरी प्रकरणांची सि.आय्.डीमार्फत स्वतंत्रपणे चौकशी करावी.

२] घटनास्थळी संपूर्ण संरक्षण मिळावे.

३] हल्लेखोर धनाजी शेठ व त्याच्या साथीदारांना तात्काळ अटक व्हावी.

४] हल्लेखोरांना अटकपूर्व जामीन मिळता कामा नये.

आपला,

[signature]

[ दिपक नायनाक ]
"युक्रांद"- मुंबई - कार्यवाहकरिता